# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक - १६१

**सभावृत्तांत**

दिनांक - २३.०३.२०१० वेळ-दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक २३.०३.२०१० रोजी दुपारी २.०० वा. महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.प्रशांत कृष्णराव शितोळे - सभापती
२. मा.जगदीश शंकर शेट्टी
३. मा.सौ.आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी
४. मा.जितेंद्र बाबासाहेब ननावरे
५. मा.सुरदास तुकाराम गायकवाड
६. मा.आण्णा उर्फ मनोहर पवार
७. मा.सौ.सुलोचना बबन बढे
८. मा.सुमनताई मधुकर पवळे
९. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव
१०.मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
११.मा.थोरात एकनाथ दादा
१२.मा.तानाजी विठ्ठल खाडे
१३.मा.प्रेमकुमार शंकरन नायर उर्फ बाबू नायर
१४.मा.सौ.वर्षा विलास मडीगेरी

याशिवाय मा.आशिष शर्मा-आयुक्त,मा.डुंबरे-अति.आयुक्त,मा.देशमुख, मा.भोसेकर,मा.मुंढे,मा.फडणीस-सहा.आयुक्त,मा.घाडगे-मुख्य लेखा परिक्षक, मा.चाकणकर-प्र.नगरसचिव, मा.चव्हाण-अति. शहर अभियंता,मा.तुपे-सह शहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.डॉ.कुणचगी-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.अय्यर-वैद्यकीय संचालक, मा.लोंढे-मुख्यलेखापाल, मा.थोरात,मा.महाडीक, मा.ढगे,मा.बनकर,मा.कपिले,मा.सवणे,मा.दुधेकर,मा.चिंचवडे, मा.कांबळे,मा.जाधव-कार्य.अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करून घेणेत आले-**

विषय क्रमांक :-२८) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा मनपाकडील अर्धपुतळा अनुसूचित जातीजमाती एच.ए. कर्मचारी संघटना यांचे ताब्यात देणेबाबत...

विषय क्रमांक :-२९) वॉर्ड क्र.५७ किवळे येथील ठिकठिकाणचे रस्ते बी.बी.एम. पद्धतीने डांबरीकरण करणेबाबत...

विषय क्रमांक :-३०) वॉर्ड क्र.३७ मधील अण्णासाहेब मगर नगर झोपडपट्टीमध्ये जुना संडास ब्लॉक पाडून २२ सिटस्‌चा दुमजली शौचालय बांधणेबाबत...

विषय क्रमांक :-३१) वॉर्ड क्र.३७ मधील इंदिरानगर झोपडपट्टीमध्ये जुना संडास ब्लॉक पाडून २२ सिटस्‌चा दुमजली शौचालय बांधणेबाबत...

विषय क्रमांक :- ३२) वॉर्ड क्र.३९ मधिल विद्यानगर झोपडपट्टीतील एक्साईड बॅटरी रस्त्यालगतच्या भागात २२ सिटस्‌चा दुमजली शौचालय बांधणेबाबत...

विषय क्रमांक :- ३३) ई निविदा नोटीस क्र.०९/०८-०९ काम क्र.८ मधील काम क्र.६ कामांचे करारनामे करणेस मंजुरी मिळणेबाबत...

विषय क्रमांक :-३४) वॉर्ड क्र.६ चिखली येथील बैलगाड्या शर्यतीसाठी घाट बांधणेबाबत...

विषय क्रमांक :-३५) म.न.पा. सार्वजनिक वाचनालयांकरीता सीएटी व इतर अभ्यासक्रमास उपयुक्त पुस्तके खरेदी करणेबाबत - मा.राजेंद्र साळुंके,मा.प्रेमकुमार नायर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-३६) उद्यान/वृक्षसंवर्धन विभागामार्फत लोखंडी वृक्षसंरक्षक पिंजरे खरेदीबाबत - मा.तानाजी खाडे, मा.प्रेमकुमार नायर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- ३७) रस्त्यांचे सुशोभिकरण करणेबाबत - मा.तानाजी खाडे, मा.प्रेमकुमार नायर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- ३८) महापौर चषक (जिल्हास्तर) बॉक्सिंग स्पर्धा २०१० अनुषंगाने स्टेज, मंडप, टेबल खुर्च्या व्यवस्था व विद्युत, स्पिकर माईक व्यवस्था कामीचे खर्चाबाबत - मा.तानाजी खाडे, मा.प्रेमकुमार नायर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-३९) महापौर चषक (जिल्हास्तर) शुटिंग बॉल स्पर्धा २०१० आयोजित करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत - मा.तानाजी खाडे, मा.प्रेमकुमार नायर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-४०) उच्च शिक्षणासाठी अर्थसहाय्य मिळणेबाबत - मा.तानाजी खाडे, मा.प्रेमकुमार नायर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- ४१) नविन ॲम्बेसिडर किंवा लोगन वाहन खरेदीस मान्यता देणेबाबत - मा.तानाजी खाडे, मा.प्रेमकुमार नायर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- ४२) गणेशभक्त योगी श्री.मोरया गोसावी मालिकेस अर्थसहाय्य मिळणेबाबत - मा.तानाजी खाडे, मा.प्रेमकुमार नायर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-४३) स्क्रीन प्रोजेक्शनकरिता जागा उपलब्ध करुन देणेबाबत - मा.तानाजी खाडे, मा.प्रेमकुमार नायर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-४४) MS-CIT क्लास पूर्ववत चालू करणेबाबत - मा.सुलोचना बढे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- ४५) अ प्रभागातील परिक्षा केंद्रांवर जनरेटर व विद्युत व्यवस्था करणेबाबत - मा.प्रेमकुमार नायर, मा.एकनाथ थोरात यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-४६) वाहनचालकाचे प्रशिक्षण देणेबाबत - मा.राजेंद्र साळुंके, मा.जगदीश शेट्टी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- ४७) वॉर्डातील दैनंदीन साफसफाई करणेबाबत - मा.प्रेमकुमार नायर, मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- ४८) सन २००९ - १० चे सुधारीत अंदाजपत्रकातील तरतुद वर्गीकरणाबाबत.. मा.सुमनताई पवळे, मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव..

---------------------

अ) दिनांक २.३.२०१०, ९.३.२०१० व १७.३.२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १५८) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक ९.३.२०१० व १७.३.२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १५९) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

क) दिनांक १७.३.२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १६०) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------------------

ठराव क्रमांक :- १०८१५ विषय क्रमांक :- १
दिनांक-२३.०३.२०१० विभाग - दूरसंचार
सुचक- मा.जगदीश शेट्टी अनुमोदक - मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.दूरसंचार/४९/१० दि.२२/२/२०१०
विषय - जकात विभागाकरिता कार्यालयीन कामकाजासाठी मोबाईल सुविधा पुरविणेबाबत..

विषय क्रमांक १चा विचार दि.१३.४.२०१० चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक :- १०८१६ | विषय क्रमांक :- २
दिनांक-२३.०३.२०१० | विभाग-फॅमिलि वेलफेअर सोसायटी
सुचक- मा.जितेंद्र ननावरे | अनुमोदक - मा.सुरदास गायकवाड
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आर.सी.एच/आस्था/कावि/६३/१० दि.२४/२/२०१०

विषय :- आर.सी.एच. कार्यक्रम अधिकारी या पदावर एकत्रित मानधनावर नियुक्तीबाबत...

विषय क्रमांक २ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८१७ | विषय क्रमांक :- ३
दिनांक-२३.०३.२०१० | विभाग - वैद्यकीय
सुचक- मा.मनोहर पवार | अनुमोदक - मा.सुलोचना बढे
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.RCH/आस्था/कावि/६४/१० दि.२४/२/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

आर.सी.एच.कार्यक्रमांतर्गत करार तत्वावर क्षेत्रिय कर्मचाऱ्यांची प्रस्तावात नमुद प्रमाणे पदे विहीत केलेल्या एकत्रित मानधनावर करार तत्वावर आर.सी.एच. अंतर्गत भरणेस व सदर पदांसाठी होणारा मानधनावरील प्रति माहचा खर्च मनपा फंडातून आर.सी.एच. सोसायटीस धनादेशाव्दारे अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८१८ | विषय क्रमांक :- ४
दिनांक-२३.०३.२०१० | विभाग-भौगोलिक सुचना प्रणाली कक्ष
सुचक- मा.सुमन पवळे | अनुमोदक - मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जीआयएस/११/कावि/९७/१० दि.३/३/२०१०

विषय - GISDA Application ची देखभाल व दुरुस्ती करणेबाबत...

विषय क्रमांक ४चा विचार दि.२७.०४.२०१० चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८१९ | विषय क्रमांक :- ५
दिनांक-२३.०३.२०१० | विभाग -विद्युत
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे | अनुमोदक - मा.एकनाथ थोरात
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.विद्युत/नि/१अ/कावि/९४/१० दि.६/३/१०

विषय - निविदा नोटीस क्र.१०/७-०९/१० मधील कामाचे करारनामा करणेस मंजुरीबाबत...

विषय क्रमांक ५चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८२० विषय क्रमांक :- ६
दिनांक-२३.०३.२०१० विभाग - क प्रभाग
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.प्रेमकुमार नायर
संदर्भ:मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.कप्र/लेखा/निक/कावि/४५/१०दि.२२/२/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००८-०९ मधील अ.क्र.८७ अन्वये, भोसरी प्रभाग क्र.१९ गव्हाणेवस्ती व वॉर्ड क्र.२२ लांडेवाडी येथे एफ.आर.पी. वाचनालये बसविणे तसेच स्थापत्य विषयक इतर विविध कामे करणेकामी मे.एल.एम. तुलसानी (नि.र.रू.४,६३,९४६/- [र.रू.चार लाख त्रेसष्ट हजार नऊशे शेहचाळीस] पेक्षा १९.३५ % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८२१ विषय क्रमांक :- ७
दिनांक-२३.०३.२०१० विभाग - स्थापत्य
सुचक- मा.वर्षा मडीगेरी अनुमोदक - मा.जगदीश शेट्टी
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/१३अ/कावि/४३५/१०दि.११/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१७/२००९-१० मधील अ.क्र.४ अन्वये, वॉर्ड क्र.६ सोनवणेवस्ती येथे जुनी शाळा इमारत पाडून नविन शाळा इमारत बांधणेकामी मे.एच.एम. कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.४५,५७,०००/- [र.रू.पंचेचाळीस लाख सत्तावन्न हजार] पेक्षा ७.२९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.४२,२४,७९५/- [र.रू.बेचाळीस लाख चोविस हजार सातशे पंच्यान्नव] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८२२ विषय क्रमांक :- ८
दिनांक-२३.०३.२०१० विभाग - जलशुद्धीकरण केंद्र से.२३ विद्युत
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक - मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जशुके/वि/कावि/११६/१० दि.१२/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

जलशुध्दीकरण केंद्र से.२३ येथील पंपींग स्टेशन मध्ये कार्यान्वित असणाऱ्या ज्योती मेक स्टार्टरची दुरुस्ती दरपत्रके मागवून कोटेशन पध्दतीने तातडीने करणेकामी चा खर्च र.रू.४३,७८९/- [र.रू.त्रेचाळीस हजार सातशे एकोणनव्वद] मे.एक्सल ईलेक्ट्रिकल्स् यांना अदा करणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८२३ विषय क्रमांक :- ९
दिनांक-२३.०३.२०१० विभाग -जलशुद्धीकरण केंद्र से.२३ विद्युत
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक - मा.मनोहर पवार
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जशुके/वि/कावि/११५/१० दि.१२/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

दुर्गादेवी उद्यानाकरीता पाणीपुरवठा करणाऱ्या ५० एच.पी. क्षमतेच्या V.T. पंपाची तातडीची दुरुस्ती कोटेशन पध्दतीने करणेकामी चा खर्च र.रू.३४,०२०/- [र.रू.चौतीस हजार वीस] मे.एक्सल ईलेक्ट्रिकल्स् यांना अदा करणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८२४ विषय क्रमांक :- १०
दिनांक-२३.०३.२०१० विभाग - मुख्य लेखापरिक्षण
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक - मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ:मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/४५६/१० दि.५/३/२०१०

मुख्यलेखापरिक्षण विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८२५ विषय क्रमांक :- ११
दिनांक-२३.०३.२०१० विभाग - मुख्य लेखापरिक्षण
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक - मा.एकनाथ थोरात
संदर्भ:मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/१९/१० दि.१२/३/२०१०

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील फेब्रुवारी २०१० मधिल सुधारित एकूण कामकाज विषयक गोषवारा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८२६ विषय क्रमांक :- १२
दिनांक-२३.०३.२०१० विभाग -अतिक्रमण
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.प्रेमकुमार नायर
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अति/२/कावि/९७/१०दि.१५/३/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या परिसरातील अनाधिकृत बांधकाम विरूध्द कारवाई करणाऱ्या पथकाच्या संरक्षणासाठी पोलीस पथक नेमलेले असून एप्रिल २००६ ते फेब्रु. २००९ पर्यंतची प्रत्यक्ष वेतन व भत्ते देयकापोटी र.रू.१,२०,४६,००९/- पोलीस आयुक्त कार्यालयास अदा करणे आवश्यक असले तरी सन २००९-१० चे सुधारित अंदाजपत्रकात र.रू.५०,००,०००/- तरतूद करणेत आलेली असून तरतूद कमी पडत असल्यामुळे र.रू.१,२०,४६,००९/- पैकी र.रू.५०,००,०००/- अदा करणे आवश्यक असल्याने व उर्वरित र.रू.७०,४६,००९/- अतिक्रमण निर्मुलन व्यवस्था खर्च या

लेखाशिर्षावरील सन २०१०-११ चे अंदाजपत्रकीय तरतुदीमधून अदा करणेत येणार असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८२७ विषय क्रमांक :- १३
दिनांक-२३.०३.२०१० विभाग - आकाशचिन्ह व परवाना
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.प्रेमकुमार नायर
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आप/३/कावि/२८३/१० दि.१३/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून -

आकाशचिन्ह व परवाना विभागामार्फत मनपा क्षेत्रातील एकूण दहा चौकामधील उपलब्ध असलेल्या जागामध्ये जाहीरातीचे हक्क २ वर्षे कालावधीसाठी देणेकामी ई-टेंडरींग व्दारे एकूण २ निविदा प्राप्त झाल्या असून मे.बिग इंडिया ग्रुप, प्राधिकरण यांनी तुलनात्मक तक्त्यात नमुद केलेल्या चौकासमोरील जाहीरात हक्काचे प्रती माह प्रती चौ.फुटाचे दर सर्वात जास्त असलेने, प्रत्येक चौकाचा दर प्रत्यक्ष उपलब्ध होणाऱ्या क्षेत्रासाठी स्वतंत्र जागा भाडे न आकारता स्विकृत करणेस व कामाचा करारनामा २ वर्षे कालावधी ऐवजी ५ वर्षे कालावधीसाठी करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८२८ विषय क्रमांक :- १४
दिनांक-२३.०३.२०१० विभाग - स्थापत्य
सुचक- मा.वर्षा मडीगेरी अनुमोदक - मा.जगदीश शेट्टी
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/३४/१० दि.१५/३/१०
विषय - पिंपरी चिंचवड शहरातील मुख्य चौकातील वाहतुक सुधारणा करणेसाठी कामे करणेबाबत...

विषय क्रमांक १४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८२९ विषय क्रमांक :- १५
दिनांक-२३.०३.२०१० विभाग - स्थापत्य
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक - मा.सुरदास गायकवाड
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/३३/१० दि.१५/३/१०
विषय - पिंपरी वॉर्ड क्र.७२ येथे स्थापत्यविषयक दुरुस्तीची कामे करणेबाबत...

विषय क्रमांक १५चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८३० विषय क्रमांक :- १६
दिनांक-२३.०३.२०१० विभाग -स्थापत्य क मुख्यालय
सुचक- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक - मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/३क/कावि/४७/१० दि.१५/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१७/२००९-१० मधील अ.क्र.१० अन्वये, मनपाच्या क प्रभागातील नेहरूनगर येथिल वॉर्ड क्र.२७, २८, ३० व कासारवाडी येथिल वॉर्ड क्र.९९, १०० येथे एफ.आर.पी. वाचनालय बसविणे (फेरनिविदा) कामी मे.बरखा एन्टरप्राईजेस (नि.र.रू.२२,४५,८२०/- [र.रू.बावीस लाख पंचेचाळीस हजार आठशे वीस] पेक्षा ३१.४१ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८३१ विषय क्रमांक :- १७
दिनांक-२३.०३.२०१० विभाग - मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक - मा.सुलोचना बढे
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/१/कावि/११३/१० दि.१७/३/२०१०
विषय - नागरवस्ती विभागासाठी लेडीज व जेन्टस सायकली खरेदीबाबत...

विषय क्रमांक १७चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८३२ विषय क्रमांक :- १८
दिनांक-२३.०३.२०१० विभाग - स्थापत्य
सुचक- मा.सुमनताई पवळे अनुमोदक - मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/१आ/कावि/४३६/१० दि.१३/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.११/२००९-१० मधील अ.क्र.४६ अन्वये, आकुर्डी खंडोबामाळ ते दळवीनगर ROB साईडपट्टीचे रूंदीकरण व पावसाळी गटर करणेकामी मे.एच.सी. लुंकड (नि.र.रू.२९,८७,२३०/- [र.रू.एकोणतीस लाख सत्याऐंशी हजार दोनशे तीस] पेक्षा २७.७२ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.२१,५९,१७०/- [र.रू. एकवीस लाख एकोणसाठ हजार एकशे सत्तर] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १० % पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर

करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८३३ विषय क्रमांक :- १९
दिनांक-२३.०३.२०१० विभाग - स्थापत्य
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक - मा.एकनाथ थोरात
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/३७/१०दि.१७/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१७/२००९-१० मधील अ.क्र.१८ अन्वये, वाकड सर्व्हे क्र.१ शाळा इमारत बांधणेकामी मे.हिरेन कन्स्ट्रक्शन कंपनी (नि.र.रू.१,८६,४३,४९६/- [र.रू. एक कोटी शहाऐंशी लाख त्रेचाळीस हजार चारशे शहान्नव] पेक्षा १५.२१ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१,५८,०७,८२०/- [र.रू.एक कोटी अठ्ठावन्न लाख सात हजार आठशे वीस] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १० % पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८३४ विषय क्रमांक :- २०
दिनांक-२३.०३.२०१० विभाग - स्थापत्य
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.प्रेमकुमार नायर
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/३६/१०दि.१७/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१७/२००९-१० मधील अ.क्र.१६ अन्वये, थेरगांव वॉर्ड क्र.८५ मध्ये गल्ली बोळात इंटरलॉकींग ब्लॉक बसविणेकामी मे.सांडभोर कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.२८,८५,१२१/- [र.रू.अठ्ठावीस लाख पंच्याऐंशी हजार एकशे एकवीस] पेक्षा ४३.११ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१६,४१,३४५/- [र.रू.सोळा लाख एक्केचाळीस हजार तीनशे पंचेचाळीस] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १० % पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८३५ विषय क्रमांक :- २१
दिनांक-२३.०३.२०१० विभाग - प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह
सुचक- मा.वर्षा मडीगेरी अनुमोदक - मा.जगदीश शेट्टी
संदर्भ:मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.प्रेक्षा/कावि/२९/१० दि.१७/३/२०१०

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

चिंचवड प्रेक्षागृहातील व्दारपालन सेवा पुरविणेकामी यापुर्वी दि.१६/२/१० रोजी मान्य झालेला ठराव रद्द करून मे.शुभम उद्योग, पिंपरी यांना चिंचवड प्रेक्षागृहातील ११ महिने कालावधीसाठी र.रू.२१९/- प्रति प्रयोग या दराने व्दारपालन सेवा पुरविणेचा ठेका देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८३६ विषय क्रमांक :- २२
दिनांक-२३.०३.२०१० विभाग - स्थापत्य
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक - मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/१अ/कावि/४३७/१०दि.१८/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१७/२००९-१० मधील अ.क्र.६ अन्वये, प्रभाग क्र.४९ मध्ये ठिकठिकाणी गटर, खडीमुरुम व डांबरीकरण करणे (फेरनिविदा) कामी मे.मोहनलाल मथरानी कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.४६,२२,११८/- [र.रू.शेहचाळीस लाख बावीस हजार एकशे अठरा] पेक्षा १८.१८% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू. ३७,८१,८१७/- [र.रू.सदोतीस लाख एक्याऐंशी हजार आठशे सतरा] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८३७ विषय क्रमांक :- २३
दिनांक-२३.०३.२०१० विभाग - मुख्यलेखापरिक्षक
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक - मा.मनोहर पवार
संदर्भ:मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/२०/१० दि.१५/३/१०

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१५.२.२०१० ते दि.२१.२.२०१० अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/२०/२०१० दि.१५.३.२०१० अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८३८ विषय क्रमांक :- २४
दिनांक-२३.०३.२०१० विभाग - मुख्यलेखापरिक्षक
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक - मा.सुमन पवळे
संदर्भ:मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/२१/१० दि.१५/३/१०

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२२.२.२०१० ते दि.२८.२.२०१० अखेर संपणा-या आठवड्याचा,मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/२१/२०१० दि.१५.३.२०१० अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८३९ विषय क्रमांक :- २५
दिनांक-२३.०३.२०१० विभाग - मुख्यलेखापरिक्षक
सुचक- मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक - मा.प्रभाकर वाघेरे
संदर्भ:मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/२२/१० दि.१५/३/१०

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१.३.२०१० ते दि.७.३.२०१० अखेर संपणा-या आठवड्याचा,मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/२२/२०१० दि.१५.३.२०१० अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८४० विषय क्रमांक :- २६
दिनांक-२३.०३.२०१० विभाग - स्थापत्य
सुचक- मा.एकनाथ थोरात अनुमोदक - मा.तानाजी खाडे
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्थापत्य/क.मु./१२/१० दि.१८/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वॉर्ड क्र.१०, मोशी येथे शिवजयंती उत्साहासाठी मंडप व्यवस्था व इतर कामे सर्वात कमी दराचे अंदाजपत्रकीय दराने र.रू. १,३५,८७५/- [र.रू.एक लाख पस्तीस हजार आठशे पंच्याहत्तर] निविदा न मागविता थेट पध्दतीने करून घेणेकामी मे.लालदीप कन्स्ट्रक्शन यांचेबरोबर करारनामा करून घेण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८४१ विषय क्रमांक :- २७
दिनांक-२३.०३.२०१० विभाग - संगणक
सुचक- मा.प्रेमकुमार नायर अनुमोदक - मा.वर्षा मडीगेरी
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.संगणक/१०/कावि/८०/१० दि.१७/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

Training Programme on Computerised Office Administration For Pas चे संगणक विषयक प्रशिक्षणा साठी श्रीम.मेघा साळुंके (मा.आयुक्त कक्ष),

अति.आयुक्त कक्षातील श्रीम.विजयश्री देसाई, परवाना विभागातील श्रीम.सुनिता पळसकर दि.२ ते ५ मार्च २०१० या कालावधीत यशदा, पुणे येथे उपस्थित रहाणेकरिता प्रति प्रशिक्षणार्थी र.रू. ३,०००/- याप्रमाणे एकूण ३ कर्मचाऱ्यांकरिता एकूण र.रू. ९,०००/- [र.रू.नऊ हजार] यशदा, पुणे यांना अदा करणेत आली असल्याने सदरच्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले-

ठराव क्रमांक :- १०८४२ विषय क्रमांक :- २८
दिनांक-२३.०३.२०१० विभाग - स्थापत्य
सुचक- मा.जगदीश शेट्टी अनुमोदक - मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/काअ/बमु/४४९/१० दि.१९/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी येथील मुख्य चौकामधील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा मनपाने पूर्वी काढून ठेवलेला अर्धपुतळा पिंपरी येथील हिंदुस्थान ऍंटीबायोटीक्स कं.लि. यांचे वसाहतीमधील उद्यानामध्ये बसविणेकामी अनुसुचित जाती/जमाती (आदीवासी भटक्या विमुक्त जाती/जमाती) एच.ए. कर्मचारी संघटना यांना संघटनेने पुतळा स्वखर्चाने बसविणे व बसविणेकामी आवश्यक सर्व परवानग्या/मान्यता अनुसुचित जाती/जमाती (आदीवासी भटक्या विमुक्त जाती/जमाती) एच.ए.कर्मचारी संघटना यांनी घेणेच्या अटींवर अर्धपुतळा जसा आहे तसा विनामुल्य देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८४३ विषय क्रमांक :- २९
दिनांक-२३.०३.२०१० विभाग - स्थापत्य
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक - मा.सुरदास गायकवाड
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/२ब/कावि/४०/१० दि.१९/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.९/२००९-१० मधील अ.क्र.२ अन्वये, वॉर्ड क्र.५७ किवळे येथील ठिकठिकाणचे रस्ते बी.बी.एम. पद्धतीने डांबरीकरण करणेकामी मे.जी.जी.साठे (नि.र.रू.१७,९२,४४४/- [र.रू.सतरा लाख ब्याण्णव हजार चारशे चव्वेचाळीस] पेक्षा ३९.९९% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू. १०,७५,६४६/- [र.रू.दहा लाख पंच्याहत्तर हजार सहाशे सेहेचाळीस] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा

करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८४४ विषय क्रमांक :- ३०
दिनांक-२३.०३.२०१० विभाग - झो.नि.पु.स्थापत्य
सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक - मा.सुलोचना बढे
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/१४८/१० दि.२२/३/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वॉर्ड क्र.३७ अण्णासाहेब मगर नगर येथे मे.सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन यांचेकडून संडास ब्लॉक बांधणेचे निविदा न मागवीता व करारनामा करुन तसेच या कामासाठी बँक गॅरंटी न घेता कामाचे आदेशासोबत निविदा रकमेच्या ५०% आगावू व ५०% काम पूर्ण झाल्यावर ४०% रक्कम आगावू व उर्वरीत १०% रक्कम काम १००% पुर्ण झाल्यावर अदा करणेचे अटीवर करुन घेणेस व त्यासाठी येणारा खर्च रक्कम रुपये ४०,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८४५ विषय क्रमांक :- ३१
दिनांक-२३.०३.२०१० विभाग - झो.नि.पु.स्थापत्य
सुचक- मा.सुमनताई पवळे अनुमोदक - मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/१४९/१० दि.२२/३/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वॉर्ड क्र.३७ इंदिरानगर येथे मे.सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन यांचेकडून संडास ब्लॉक बांधणेचे निविदा न मागवीता व करारनामा करुन तसेच या कामासाठी बँक गॅरंटी न घेता कामाचे आदेशासोबत निविदा रकमेच्या ५०% आगावू व ५०% काम पूर्ण झाल्यावर ४०% रक्कम आगावू व उर्वरीत १०% रक्कम काम १००% पुर्ण झाल्यावर अदा करणेचे अटीवर करुन घेणेस व त्यासाठी येणारा खर्च रक्कम रुपये ४०,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८४६ विषय क्रमांक :- ३२
दिनांक-२३.०३.२०१० विभाग - झो.नि.पु.स्थापत्य
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक - मा.एकनाथ थोरात
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/१५०/१० दि.२२/३/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वॉर्ड क्र.३९ विद्यानगर येथे मे.सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन यांचेकडून संडास ब्लॉक बांधणेचे निविदा न मागवीता व करारनामा करुन तसेच या कामासाठी बँक गॅरंटी न घेता कामाचे आदेशासोबत निविदा रकमेच्या ५०% आगावू व ५०% काम पूर्ण झाल्यावर ४०% रक्कम आगावू व उर्वरीत १०% रक्कम काम १००% पुर्ण झाल्यावर अदा करणेचे अटीवर करुन घेणेस व त्यासाठी येणारा खर्च रक्कम रुपये ४०,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८४७ विषय क्रमांक :- ३३
दिनांक-२३.०३.२०१० विभाग - स्थापत्य
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.प्रेमकुमार नायर
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/३९/१० दि.२३/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.९/२००८-९ मधील अ.क्र.८ अन्वये, ड प्रभागामधील नवी सांगवी या रस्त्याचे रुंदीकरण व सुधारणे करणेकामी मे.साईप्रभा कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.५०,००,०००/- [र.रू.पन्नास लाख] पेक्षा ३४.५% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.३२,७५,०००/- [र.रू.बत्तीस लाख पंच्याहत्तर हजार] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८४८ विषय क्रमांक :- ३४
दिनांक-२३.०३.२०१० विभाग - स्थापत्य
सुचक- मा.वर्षा मडीगेरी अनुमोदक - मा.जगदीश शेट्टी
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/१अ/कावि/--/१० दि.--/--/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१७/२००९-१० मधील अ.क्र.२ अन्वये, वॉर्ड क्र.६ चिखली येथील बैलगाड्या शर्यतीसाठी घाट बांधणेकामी मे.शामा कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.२३,२५,८६३/- [र.रू.तेवीस लाख पंचवीस हजार आठशे त्रेसष्ट] पेक्षा २८.००% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१६,७४,६२१/-

[र.रू.सोळा लाख चौऱ्याहत्तर हजार सहाशे एकवीस] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८४९ विषय क्रमांक :- ३५
दिनांक-२३.०३.२०१०
सुचक- मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक - मा.प्रेमकुमार नायर
संदर्भ:मा.राजेंद्र साळुंके, मा.प्रेमकुमार नायर यांचा प्रस्ताव...

दहावी/बारावीनंतर पुढे काय? असा प्रश्न सर्व विद्यार्थी व पालक यांना भेडसावत असतो. त्यादृष्टीने दहावी/बारावीच्या विद्यार्थ्यांना करिअर निवडण्यास व त्यादृष्टीने स्पर्धात्मक परिक्षांचा अभ्यास करण्यासाठी सीईटी व इतर अभ्यासक्रमांस उपयुक्त पुस्तके महानगरपालिकेच्या वाचनालयात असावीत. त्यामुळे म.न.पा.च्या विविध वाचनालयांत सीईटी व इतर अभ्यासक्रमास उपयुक्त पुस्तके (एक संच अंदाजे र.रु.१५,०००/- पर्यंत) थेट पद्धतीने खरेदी करणेस अथवा प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८५० विषय क्रमांक :- ३६
दिनांक-२३.०३.२०१०
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.प्रेमकुमार नायर
संदर्भ:मा.तानाजी खाडे,मा.प्रेमकुमार नायर यांचा प्रस्ताव...

सन २०१०-११ या आर्थिक वर्षासाठी वृक्षारोपणाची व वृक्षसंवर्धनाची कामे तातडीने होणे आवश्यक असलेने मे.रेखा इंजिनिअरींग वर्क्स यांचा पुर्वानुभव लक्षात घेऊन व म.न.पा.चे आर्थिकहित लक्षात घेता उद्यान विभागाकडील निविदा नोटिस क्र.३/२००८-०९ नुसार जुन्याच व लघुत्तम निविदा दरानुसार रु.९२५/- प्रतिनग याप्रमाणे उद्यान विभागामार्फत आवश्यक वृक्षसंरक्षक लोखंडी पिंजरे खरेदी करण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास अथवा ४० लाखापर्यंतचे खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर वर्षासाठी तरतुद कमी पडत असलेने ट्रि गार्ड दुरुस्तीसाठीची र.रु.१० लाख तरतूद सदर कामासाठी वर्ग करण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८५१ विषय क्रमांक :- ३७

दिनांक-२३.०३.२०१०

सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.प्रेमकुमार नायर

संदर्भ:मा.तानाजी खाडे,मा.प्रेमकुमार नायर यांचा प्रस्ताव...

म.न.पा.चे उद्यान विभागाकडील १) नाशिक फाटा ते खराळवाडी रस्त्यावर सुशोभिकरण करणे (भाग १) नि.क्रं.७/२००६-०७ व सदर कामांतर्गत २) पिंपरी ते भक्ती शक्त उद्यान, निगडी रस्त्यापर्यंत सुशोभिकरण करणे (भाग २) ही पुणे मुंबई हमरस्त्यावरील दोन्ही कामे मे.बी.व्ही.जी.ई.लि. यांचेमार्फत पुर्ण झालेने सदर अ.क्र.१ व २ मधील झालेल्या सुशोभिकरण कामाचे देखभालीचे काम नि.क्र.७/२००६-०७ चे मुळ कामांतर्गत मे.बी.व्ही.जी.ई.लि. यांचेकडून उद्यान विभागाकडील नि.क्र.९/१ २००७-०८ मधील देखभाल विषयक कामाचे अंदाजपत्रकातील दराप्रमाणे माहे मार्च २०११ पर्यंत करुन घेणेस व त्याकामी येणारे अंदाज र.रु.४० लाखापर्यंतचे खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच वर नमुद कामांपैकी अ.क्र.१ भाग १चे देखभालविषयक कामास व खर्चास माहे ऑक्टोबर २००८ पासुन व अ.क्र.२, भाग २ चे कामास व खर्चास दि.१५.३.१० पासुन मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८५२ विषय क्रमांक :- ३८

दिनांक-२३.०३.२०१०

सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.प्रेमकुमार नायर

संदर्भ:मा.तानाजी खाडे,मा.प्रेमकुमार नायर यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे वतीने, दिनांक २९ ते ३१/०३/२०१० या काळात संत ज्ञानेश्वर गृहरचना संस्था म्हाडा फेडरेशन पिंपरी ४११ ०१८ येथे महापौर चषक जिल्हास्तरीय मुष्टीयुद्ध स्पर्धा २०१० आयोजित करणेत येत आहे. मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.९४८० दिनांक २७/१०/२००९ अन्वये सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात महापौर चषक क्रीडा स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी अंदाजे येणाऱ्या र.रु.१४,७८,५५०/- चे खर्चास मान्यता दिलेली आहे. यामध्ये महापौर चषक जिल्हास्तर बॉक्सिंग स्पर्धा २०१० करिता र.रु.२,४०,०००/- च्या खर्चाचा समावेश आहे. या खर्चामध्ये स्टेज,मंडप,टेबल खुर्च्या व्यवस्था खर्च र.रु.२०,०००/- व विद्युत,स्पिकर माईक व्यवस्था खर्च र.रु.१६,०००/- गृहित धरलेला आहे. सदर खर्च अत्यल्प असल्याने, या खर्चामध्ये स्टेज,मंडप,टेबल खुर्च्या व्यवस्था व विद्युत,स्पिकर माईक व्यवस्था करणे अडचणीचे होत आहे. तरी माहे मार्च २०१० मध्ये आयोजित करावयाच्या महापौर चषक (जिल्हास्तर) बॉक्सिंग स्पर्धा २०१० अनुषंगाने स्टेज,मंडप,टेबल खुर्च्या व्यवस्थाकामी र.रु.१,००,०००/- व विद्युत,स्पिकर माईक व्यवस्था कामी र.रु.७५,०००/- इतका खर्च अपेक्षित असल्याने, सदरचे खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८५३ विषय क्रमांक :- ३९

दिनांक-२३.०३.२०१०

सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.प्रेमकुमार नायर

संदर्भ:मा.तानाजी खाडे,मा.प्रेमकुमार नायर यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे वतीने, माहे मार्च २०१० मध्ये वॉर्ड क्र.२३ महात्मा फुले प्राथ.शाळा,भोसरी येथे महापौर चषक जिल्हास्तरीय शुटिंग बॉल स्पर्धा २०१० आयोजित करणेत येत आहे. मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.९४८० दिनांक २७/१०/२००९ अन्वये सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात महापौर चषक क्रीडा स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी अंदाजे येणाऱ्या र.रु.१४,७८,५५०/- चे खर्चास मान्यता दिलेली आहे. यामध्ये महापौर चषक जिल्हास्तर कॅरम व बुद्धीबळ स्पर्धेकरिता र.रु.१,८८,१००/- च्या खर्चाचा समावेश आहे. परंतू सदर स्पर्धा काही तांत्रिक कारणामुळे रद्द झाल्याने, माहे मार्च २०१० मध्ये महापौर चषक जिल्हास्तर शुटिंग बॉल स्पर्धा या वॉर्ड क्र.२३ महात्मा फुले प्राथ.शाळा, भोसरी येथे आयोजित करणेस अंदाजे र.रु.२,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी माहे मार्च २०१० मध्ये महापौर चषक जिल्हास्तर शुटिंग बॉल स्पर्धा या वॉर्ड क्र.२३ महात्मा फुले प्राथ.शाळा, भोसरी येथे आयोजित करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे र.रु.२,००,०००/- अथवा प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८५४ विषय क्रमांक :- ४०

दिनांक-२३.०३.२०१०

सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.प्रेमकुमार नायर

संदर्भ:मा.तानाजी खाडे,मा.प्रेमकुमार नायर यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या महिला बालकल्याण योजनेअंतर्गत १२ वी नंतरचे वैद्यकीय, अभियांत्रिकी, संगणक प्रथम वर्ष पदवी परीक्षा यासारखे उच्च शिक्षण घेणाऱ्या युवतींना अर्थसहाय्य देणेत येते. सदर योजनेची अर्ज स्वीकृतीची मुदत संपलेली आहे. परंतु कु.हेजल राजकुमार कन्नन व कु.नम्रता भास्कर बोरोले या दोन विद्यार्थीनी मुदतीत अर्ज सादर करु शकल्या नाहीत. या दोन्ही विद्यार्थीनांना कॉम्प्युटर इंजिनिअरींग या शाखेला प्रथम वर्षाला प्रवेश मिळालेला असून योजनेच्या नियमाप्रमाणे या आर्थिक वर्षात त्यांना अर्थसहाय्य मिळाले नाहीतर त्या आर्थिक सहाय्यापासून वंचित राहतील. तरी या दोन्ही विद्यार्थिनींचे अर्ज मुदतीनंतर स्विकारुन त्यांना अर्थसहाय्य अदा करणेबाबत येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८५५ विषय क्रमांक :- ४१
दिनांक-२३.०३.२०१०
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.प्रेमकुमार नायर
संदर्भ:मा.तानाजी खाडे,मा.प्रेमकुमार नायर यांचा प्रस्ताव...

मा.सभागृह नेते यांच्याकडील कार्यालयीन कामकाजासाठी वापरात असलेले वाहन क्र. MH१४ AE ८०४७ हे ॲम्बेसिटर वाहन जुने झालेले असून वारंवार नादुरुस्त होते. त्यामुळे कार्यालयीन कामकाजामध्ये अडथळे येत आहेत. सबब मा.सभागृह नेते यांच्या कार्यालयीन कामकाजासाठी नविन ॲम्बेसिटर ब्रँड मॉडेल किंवा महिंद्रा लोगन (शासनाच्या अटी शर्तीनुसार) वाहन (वातानुकूलीत यंत्रणा, पॉवर स्टेअरींग व पॉवर विंडोसह) तातडीने खरेदी करणेस व त्याकामीचे खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८५६ विषय क्रमांक :- ४२
दिनांक-२३.०३.२०१०
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.प्रेमकुमार नायर
संदर्भ:मा.तानाजी खाडे,मा.प्रेमकुमार नायर यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड शहरातील आद्यदैवत श्री.मोरया गोसावींवर आधारीत गणेश भक्त योगी श्री.मोरया गोसावी मालिका चिंचवड देवस्थान ट्रस्टमार्फत गेल्या दोन वर्षांपासून प्रसिद्ध कलावंत रवींद्र मंकणी यांच्या रोहन्स आय बॅनरखाली निर्माण होत आहे. या मालिकेसाठी प्रख्यात संगीतकार पंडीत यशवंत देव व ह्रदयनाथ मंगेशकर यांचे संगीत असून २० भागांची ही मालिका तयार करणेत आलेली असून सदर मालिका सह्याद्री दूरदर्शनवरुन प्रक्षेपित करणेसाठी सुमारे १०,००,०००/- खर्च अपेक्षित आहे. मालिका निर्मितीसाठी देवस्थानने सुमारे २२ लाख खर्च केलेले असून प्रक्षेपित करणेसाठी या मालिकेला आर्थिक पाठबळाची आवश्यकता असून सदर चिंचवड देवस्थान ट्रस्टने महापालिकेला विकासासाठी जमिनी देऊन विकास कामांत ट्रस्टने महापालिकेस सहकार्य केलेले आहे. या अनुषंगाने सदरची मालिका सह्याद्री वाहिनीवरुन प्रक्षेपित करणेसाठी महापालिकेमार्फत चिंचवड देवस्थान ट्रस्टला आर्थिक सहाय्य म्हणून र.रु.१०,००,०००/- (अक्षरी र.रु.दहा लाख फक्त) स मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८५७ विषय क्रमांक :- ४३
दिनांक-२३.०३.२०१०
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.प्रेमकुमार नायर
संदर्भ:मा.तानाजी खाडे,मा.प्रेमकुमार नायर यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड परिसरातील मनपाचे विविध उद्यानांमध्ये मनपा परिसरातील नागरिकांसाठी विविध सूचना,विकास कामे, सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रमांचे माहिती जाहीरातीसह दाखविणेच्या अटीवर मे.रामा व्हिजन या संस्थेस दोन वर्षे कालावधीकरीता L.C.D. व स्क्रीन प्रोजेक्शन करीता जागा उपलब्ध करुन देण्यास व

त्याकामी करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८५८ विषय क्रमांक :- ४४
दिनांक-२३.०३.२०१०
सुचक-मा.सुलोचना बढे अनुमोदक - मा.तानाजी खाडे
संदर्भ:मा.सुलोचना बढे,मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव...

८वी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थीनींना MS-CIT प्रशिक्षण पुर्ववत संस्थेस देऊन ते आंमलात आणणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८५९ विषय क्रमांक :- ४५
दिनांक-२३.०३.२०१०
सुचक-मा.प्रेमकुमार नायर अनुमोदक - मा.एकनाथ थोरात
संदर्भ:मा.प्रेमकुमार नायर,मा.एकनाथ थोरात यांचा प्रस्ताव...

शालांतप्रमाणपत्र परिक्षा-२०१० परिक्षा केंद्रांवर विद्युत जनरेटर व्यवस्था करणेबाबत शासनाने आदेश निर्गत केलेले आहेत. त्याअनुषंगाने अ प्रभाग पिं.चिं. म.न.पा. अंतर्गत येणाऱ्या परिक्षा केंद्रावर दि.४/३/२०१० ते २३/३/२०१० या कालावधीमध्ये जनरेटर व विद्युत व्यवस्था करण्यात आली होती. सदर व्यवस्थेकरीता मे.मोरया मंडप डेकोरेटर्स चिंचवड यांचेकडुन पुर्व स्वीकृत दराने (निविदा दराने) करारनामा न करता थेट पद्धतीने करवुन घेणेत आलेले आहे. याकामी रक्कम रुपये ९९,९९२/- इतका खर्च झाला असुन सदर रक्कम मे.मोरया मंडप डेकोरेटर्स चिंचवड यांना अदा करणे आवश्यक असल्याने या कामाचे खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८६० विषय क्रमांक :- ४६
दिनांक-२३.०३.२०१०
सुचक-मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक - मा.जगदीश शेट्टी
संदर्भ:मा.राजेंद्र साळुंके,मा.जगदीश शेट्टी यांचा प्रस्ताव...

कागद,काच,पत्रा, कष्टकरी पंचायत यांचेकडिल ३१ महिला व पुरुष सभासदांना वाहनचालक हे प्रशिक्षण अखिल भारतीय संस्थानिक स्वराज्य संस्था, पुणे यांचेमार्फत त्यांचेकडील मंजूर दरानुसार देणेस मान्यता देणेत येत आहे.

मंजूर दर खालीलप्रमाणे आहेत -

१) फोर व्हीलर - कालावधी २० दिवस - मंजूर दर प्रति लाभार्थी ३,०००/-

२) थ्री व्हीलर - कालावधी १८ दिवस - मंजूर दर प्रति लाभार्थी २,३००/-

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८६१ विषय क्रमांक :- ४७

दिनांक- २३.०३.२०१०

सुचक-मा.प्रेमकुमार नायर अनुमोदक - मा.राजेंद्र साळुंके

संदर्भ:मा.प्रेमकुमार नायर,मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव...

खाली नमुद केलेल्या संस्थांकडून त्यांचे नावासमोर नमूद केलेल्या वॉर्डातील दैनंदीन साफसफाई करुन घेणेकामी लागणारे आवश्यक ते स्वयंसेवक किमान वेतन दराने उपलब्ध करुन घेउन त्यांचेकडून पुढील ३ वर्ष कालावधीत दैनंदीन साफसफाई करुन घेण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

१) अजित स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था ६१

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक :- १०८६२ विषय क्रमांक :- ४८

दिनांक- २३.०३.२०१०

सुचक-मा.सुमनताई पवळे अनुमोदक - मा.राजेंद्र साळुंके

संदर्भ:मा.सुमनताई पवळे,मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव...

महापालिकेचे सन २००९-१० चे सुधारित अंदाजपत्रकास मा.महापालिका सभेने अंतिम मान्यता दिलेली असून सुधारित अंदाजपत्रकात काही विभागांचे कामांसाठी तरतुदी कमी आहेत. त्यामुळे प्रस्तावासोबत जोडलेल्या प्रपत्राप्रमाणे तरतुदीत वाढ/घट करणे आवश्यक आहे. तरी त्याप्रमाणे अंदाजपत्रक तरतुद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(प्रशांत कृष्णराव शितोळे)
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक- नस/७/कावि/३७९/२०१०
दिनांक - २५/०३/२०१० चे लगत

सही/-
प्र.नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.